# रॉबर्ट घोडा आणि गुलाब

जोआन हीलब्रोनर

चित्र: पी. डी. ईस्टमैन

मराठी: अश्विनी बर्वे



रॉबर्ट एक छोटा आनंदी घोड़ा होता.

तो एका फार्मवर राहत असे. तिथे तो आपल्या आईवडिलाबरोबर राहत असे.

एक दिवस रॉबर्टने एक पार्टी ठेवली. त्यादिवशी त्याचा वाढदिवस होता.

फार्मवरचे त्याचे सगळे मित्र पार्टीला आले.

त्यांनी येतांना एक मोठा केक आणला, “वाढदिवसाच्या शुभेच्छा, रॉबर्ट,“ त्याच्या मित्रांनी म्हटले. “तुला वाढदिवसाच्या शेकडो शुभेच्छा.”

केक खूप सुंदर होता.

त्याच्या चारी बाजूला मोठमोठी गुलाबाची फुले होती. रॉबर्टला ती लाल गुलाबाची फुले खूप आवडली. त्याने आपले नाक सरळ एका फुलात घातले आणि त्याने दीर्घ श्वास घेतला.

मग रॉबर्टला वेगळेच असे काहीतरी वाटले. त्याच्या डोळ्यात खाजायला लागले. त्याच्या नाकात पण खाज यायला लागली आणि मग

"आच्छी!" रॉबर्ट शिंकला.

तो एवढ्या जोरात शिंकला की बस! काय शिंक होती ती! त्याच्या शेतावरील सर्व मित्र उडून गेले. केक पण वर उडाला. गुलाबाची फुले सुद्धा वर उडून गेली. आणि रॉबर्ट स्वतः खाली पडला.

त्याच्या आईने त्वरित डॉक्टरांना बोलावले. त्यांनी रॉबर्टला तपासले.

“तोंड उघड आणि आ कर,” डॉक्टर म्हणाले.

"आह!" रॉबर्ट म्हणाले.

"आहा!" डॉक्टर म्हणाले.

"मला कळलं तुला शिंका का आली.”

"मला आता नक्की कळलं," डॉक्टर म्हणाले.

"तू इकडे ये, रॉबर्ट.

आणि गुलाबांच्या फुलांचा सुंगंध घे."



रॉबर्टने आपले नाक त्या गुलाबांच्या फुलात घातले. त्याने थोडे हुंगले, परत त्याच्या नाकात खाज आली. परत त्याच्या डोळ्यात खाज आली.

"आच्छी!" रॉबर्ट शिंकला!

त्या धमाक्याने खिडकी हलली.
दरवाजा धाडकन उघडला.

गुलाब वर उडाले.

आणि डॉक्टर खाली पडले.

“माझे बरोबर आहे,” डॉक्टर म्हणाले.

"गुलाब तुझ्यासाठी खूप वाईट आहेत.
बघ,या फार्मवर खूप गुलाब आहेत.

तुला त्यापासून दूर राहयला पाहिजे.
आता तुला शहरात जायला पाहिजे.”



म्हणून रॉबर्टला शहरात जावं लागलं.

“अच्छा," त्याने त्याच्या आईवडिलांना म्हटले.

“मी शहरात नीट राहिल. मी काम शोधेल.
एखादी नोकरी शोधेल.”

रॉबर्टला शहरात नोकरी मिळाली.

तो एका दुध्वाल्याकडे काम करू लागला.

तो दुधवाल्याची गाडी घेऊन शहरभर फिरत असे.



ती एक चांगली नोकरी होती आणि

रॉबर्ट त्यावर खुश होता.

त्याला ही नोकरी आवडली होती.

मग एक दिवस एक माणूस रॉबर्टच्या अगदी जवळ आला. त्याच्या कोटाला एक फुल होते. आणि ते फुल गुलाबाचे होते.

एक गुलाब!

आणि तो ही रॉबर्टच्या नाकाच्या खाली.

रॉबर्टला परत एक विचित्र जाणीव झाली. त्याच्या नाकात खाज यायला लागली. आणि त्याच्या डोळ्यात खाज यायला लागली. आणि ....

"आच्छी!" रॉबर्ट शिंकला !

त्याची गाडी मोडली.

सगळं दूध सांडले,वाहू लागले.

दूधवाला वर उडाला आणि गुलाब असणारा माणूस जमिनीवर खाली पडला.

"चल निघ!" दूधवाल्याने रॉबर्टला म्हटले.

“तू माझ्याकडे काम करण्याच्या लायकीचा नाही.”

म्हणून रॉबर्टला परत कामाचा शोध घ्यावा लागला. पण एका घोड्याला काम मिळवणे अवघड होते. त्याने अनेक दिवस काम शोधले.



एक दिवस त्याने काही घोडे बघितले. त्यावर लोक बसलेले होते. “बघा! मी पण हे काम करू शकतो,” रॉबर्टने म्हटले. “मी हे काम मागतो.”

रॉबर्ट दरवाज्याजवळ गेला. एक माणूस बाहेर आला. “तू एक चांगला घोडा वाटतो.,” माणसाने रॉबर्टला म्हटले.



“तू माझ्यासाठी काम करू शकतो. पण तुला इथे खूप कष्ट घ्यावे लागतील. तुला सांगितलेले सगळं करावं लागेल.”



मग रॉबर्टला काम मिळाले. त्याने ते सगळे केले जे त्याला सांगितले गेले. जेव्हा त्याला हळू चालायला सांगितले जात असे त्यावेळी तो हळू चाले.



जेव्हा त्याला वेगाने चालायला सांगितले जाई तेव्हा तो वेगात चाले.



रॉबर्ट ते सगळं करे जे त्याला सांगितले जाई.

“मला हे काम आवडते,” रॉबर्टने म्हटले.

“आणि मी ही नोकरी कायम करेन.”

मग एक दिवस

रॉबर्ट एका महिलेला फिरायला घेऊन गेला.
सगळं काही नीट चालू होतं,

तेव्हाच अचानक

“ते बघ!" महिला म्हणाली .

“जरा त्या सुंदर गुलाबांच्या
फ़ुअल्न्क्दे बघ.

मला ती फुलं पाहिजे.

रॉबर्ट, मला त्वरित तिथे घेऊन चल.

बिचारा रॉबर्ट काय करू शकत होता?
त्याने तेच केले जे त्याला सांगितले गेले.
त्याने महिलेला गुलाबांच्या फुलांकडे नेले.

परत त्याला विचित्र वाटले. त्याच्या नाकात
खाज आली, डोळे खाजू लागले आणि ...

"आच्छी!" रॉबर्ट शिंकला!

त्याच्या शिंकेमुळे गाडी उडाली, फुले उडाली, महिला पण वर उडाली आणि फुलवला खाली पडला.






एकदा परत रॉबर्ट

बेरोजगार झाला.

रॉबर्टला परत काम शोधावे लागले. त्याने सगळीकडे बघितले आणि शोधले. सगळीकडे पुरुषांकडे काम होते आणि स्त्रिया सुद्धा काम करत होत्या. प्रत्येकाकडे काही ना काही काम होते.




पण घोड्याकडे काहीच काम नव्हते.

रॉबर्ट चालत राहिला,चालत राहिला. त्याने बघितले आणि शोधले. मग शेवटी रॉबर्टला काहीतरी दिसले.

त्याला एक काम दिसले. जे तो करू शकत होता. तो पोलिसांचा घोडा होऊ शकत होता.

“मी आत जाईन! मी नोकरी मागेन,” रॉबर्टने म्हटले.

जेव्हा रॉबर्ट बाहेर आला तेव्हा
तो एक पोलिस घोडा होता.

तो एक चांगला पोलीस घोडा होता. तो
पोलिसांचे सगळ्या प्रकारची कामं करायचा.

एक दिवस रॉबर्ट बँक स्ट्रीट वर काम करत होता.

तेव्हाच काही माणसे रस्त्यावर आले. एकूण तीन जण होते. त्यातल्या एकाजवळ काळ्या रंगाची बॅग होती. ते बँकेत घुसले.

रॉबर्टने त्यांना बघितले.

मग अचानक . . .

कोणीतरी ओरडले, “मदत करा,पोलीस! मदत करा.

रॉबर्टने चारी बाजूला बघितले. मग त्याने त्या तीन लोकांकडे बघितले. ते तिघेजण लुटारू होते. बँक लुटारू



लुटारू सरळ रॉबर्टकडे धावले. ते त्याच्या समोरून पळाले. रॉबर्ट वेगाने धावला.

त्याला त्या लुटारूंना अडवायचे होते.पण कसे? तो असे कसे करू शकणार होता?

आणि मग. . . .

रॉबर्टने एक गुलाबचे फुल बघितले. ते काही फार मोठे नव्हते. पण तरीही ते एक गुलाबाचे फुल होते.

रॉबर्टने विचार करू लागला, त्याने पटकन विचार केला.

रॉबर्ट त्या गुलाबाच्या फुलाजवळ गेला.

मग त्याने आपले नाक सरळ त्या फुलाजवळ नेऊन श्वास घेतला.

एक दीर्घ श्वास!

आणि मग त्याला परत ती जुनी जाणीव झाली.

त्याच्या डोळ्यात खाज येऊ लागली,
त्याच्या नाकात खाज येऊ लागली,

मग...

रॉबर्टला एक शिंक आली.

अशी शिंक जशी त्याला कधीच आली नाही! मांजरी दूर पळाल्या.

टोप्या हवेत उडाल्या.

कुत्री वर उडाले.

पक्षी खाली आले.

बंदुकांनी धमाका केला,

काळी बॅग वाला वर उडाला.

आणि लुटारू जमिनीवर पडले.

"हुर्रे! रॉबर्टसाठी हुर्रे!"

प्रत्येकजण ओरडला.

बँकवाले खुश झाले .

पोलीसवाले खुश झाले.

हर कोई खुश था.

रॉबर्टने लुटारूंना पळण्यापासून अडवले.
त्याने लुटारूंना जमिनीवर पडले.



दुसऱ्या दिवशी एक पार्टी झाली. ती पार्टी रॉबर्टसाठी होती. त्याचे आईवडील आले होते, फार्म वरचे त्याचे सगळे मित्र आले. डॉक्टर पण आले. सगळे पोलीसवाले आले. मग त्यातला एकजण उठून उभा राहिला, "रॉबर्ट," तो म्हणाला, “माझ्याकडे तुझ्यासाठी काहीतरी आहे.”



"गुलाब!" डॉक्टर ओरडले.

“आपल्या टोप्या सांभाळा.

बघा,रॉबर्टला शिंक येणार आहे.

रॉबर्ट आपल्या सगळ्यांना शिंकल्यावर
शिकागोला पाठवून देईल.

थैंक यू रॉबर्ट

रॉबर्टने थोडे हुंगले.

त्याच्या नाकात खाज आली नाही,

डोळ्यात पण खाज आली नाही,

मग रॉबर्टने खूप जोरात हुंगले.

यावेळी पण मागच्या वेळी झाले तसे काही झाले नाही.

त्याला एकही शिंक आली नाही.

त्यानंतर रॉबर्टला परत कधीच शिंक आली नाही.

अंत